**ठळक बातम्या**

- रेल्वेची भाडेवाढ मध्यरात्रीपासून लागू होणार, ५०० किलोमीटरपर्यंतचा प्रवास १० रुपयांनी महागणार

- महापालिका निवडणूक वंचित बहुजन आघाडीसोबत लढवण्याचे काँग्रेसचे प्रयत्न

- नवी मुंबई विमानतळावरुन आजपासून प्रवासी वाहतूक सुरू

**आणि**

- नाताळनिमित्त सर्वत्र उत्साहाचं वातावरण

**<><><><><>**

रेल्वेनं प्रवासभाडे आकारणीत बदल केले असून ते उद्यापासून लागू होणार आहेत. यात अनारक्षित किंवा द्वितीय श्रेणीच्या प्रवास भाड्यात पहिल्या २१५ किलोमीटर अंतरापर्यंत काहीही बदल झालेला नाही. त्यानंतर द्वितीय श्रेणीतून प्रवास करणाऱ्यांना प्रति किलोमीटरमागे १ पैसा तर एक्स्रप्रेस गाड्यांमधून प्रवास करणाऱ्यांना प्रति किलोमीटरमागे २ पैसा भाडेवाढ लागू होईल. वातानुकुलित डब्यातून प्रवास करणाऱ्यांनाही प्रति किलोमीटर २ पैसे अतिरिक्त द्यावे लागतील. यामुळे ५०० किलोमीटरचा प्रवास द्वितीय श्रेणीतून करणाऱ्यांचं भाडं १० रुपयांनी वाढणार आहे. तर वातानुकूलित श्रेणीतल्या प्रवासांना २० रुपये अतिरिक्त द्यावे लागतील.

लोकल आणि मासिक पासच्या दरात काहीही बदल केलेला नाही, असं रेल्वेनं जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर प्रमुख राजकीय पक्षांच्या हालचाली वेगाने सुरु झाल्या आहेत. राज्यात सत्ताधारी

महायुती आणि विरोधकांची महाविकास आघाडी यांच्या घटक पक्षांमधे स्थानिक पातळीवर वेगवेगळी समीकरणं मांडली जात आहेत. उमेदवारांच्या मुलाखतींसाठी दोन्ही आघाड्यांची शिबिरं होत आहेत.

छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिकेसाठी एआयएमआयएमने ८ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. नाशिक महानगरपालिकेसाठी ३ तर जालन्यासाठी एक उमेदवार पक्षाने दिला आहे. एआयएमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली.

नाशिकमधे विविध पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांनी आज भाजपामधे प्रवेश केला. भाजपा नेते आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी भाजपा कार्यालयात आयोजित कार्यक्रमात त्यांचं स्वागत केलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विनायक पांडे, आणि यतिन वाघ, मनसेचे दिनकर पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नितीन भोसले आणि काँग्रेसचे शाहू खैरे यांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><>**

महानगरपालिका निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीबरोबर आघाडी व्हावी यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितलं. काँग्रेस पक्षाच्या राज्य निवडमंडळाची बैठक आज मुंबईत टिळक भवन इथं झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. महाविकास आघाडीचा घटक पक्ष म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाशी चर्चा सुरू आहे, याशिवाय कुठल्याही पक्षाचा आघाडीसाठी प्रस्ताव आलेला नाही, तसा प्रस्ताव आला तर विचार करू असं सपकाळ म्हणाले.

मुंबईत काँग्रेस स्वतंत्र लढेल, इतर कुणाशी युती करायची ते चर्चेतून ठरवलं जाईल, असं विजय वडेट्टीवार यांनी वार्ताहरांना सांगितलं. निवडणुकीत उमेदवार देण्याचे निकष कोणते असावेत, कुणासोबत आघाडी करावी वगैरे विषयांवर आज

निवडमंडळाच्या सदस्यांनी चर्चा केली असं ते म्हणाले. शनिवारपासून उमेदवारी अर्जांचं वाटप केलं जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

**<><><><>**

बहुप्रतिक्षित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आजपासून व्यावसायिक उड्डाणं सुरू झाली. सध्या पहिल्या टप्प्यात उड्डाणं सुरू झाली आहेत. याविषयी ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड - व्हॉईस कास्ट**

*(यंदा ८ ऑक्टोबर रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या विमानतळाचं उद्घाटन झालं. मात्र प्रत्यक्षात या विमानतळाच्या परिचालनाला आजपासून सुरुवात झाली. आज सकाळी आठ वाजता बेंगळुरूहून आलेलं पहिलं विमान धावपट्टीवर उतरलं. या विमानाला हवेत पाण्याचे फवारे सोडून सलामी देण्यात आली. तर सकाळी पावणे नऊ वाजता या विमानतळावरून हैदराबादच्या दिशेने पहिलं विमान आकाशात झेपावलं. सध्या या विमानतळावरून देशभरातल्या नऊ विमानतळांवर विमान प्रवास सुरू करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात सकाळी आठ ते रात्री आठ अशी बारा तासापुरती विमानसेवा सुरू राहील. पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यापासून टप्प्याटप्पाने हे विमानतळ कार्यान्वित करण्यात येईल. हे विमानतळ पाच टप्प्यांमध्ये बांधण्यात येणार आहे. त्यातला पहिला टप्पा पूर्ण झाला असून त्यासाठी १९ हजार ६५० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. पाचही टप्पे पूर्ण झाल्यानंतर या विमानतळावरून दर वर्षी ९ कोटी प्रवासी प्रवास करू शकतील.)*

**<><><><>**

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटकडून दिले जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा व्हीएसआयचे महासंचालक संभाजी कडू पाटील यांनी काल पत्रकार परिषदेत केली. यंदाचा राज्यस्तरीय वसंतदादा पाटील सर्वोत्कृष्ट साखर कारखाना पुरस्कार बारामतीच्या सोमेश्वर सहकारी कारखान्याला जाहीर झाला आहे. ऊस उत्पादनात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरासंदर्भात पुढील वर्षापासून स्वतंत्र पुरस्कार दिले जाणार आहेत, असं पाटील यांनी सांगितलं. व्हीएसआयची 49वी वार्षिक सर्वसाधारण सभा येत्या सोमवारी होणार आहे, त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कारांचं वितरण करण्यात येईल.

**<><><><>**

नाताळचा सण आज सर्वत्र उत्साहाने साजरा होत आहे. देशभरातल्या चर्चेस आणि प्रार्थनागृहांमधे काल रात्री प्रभू येशू ख्रिस्ताच्या जन्मोत्सवानिमित्त विशेष

प्रार्थनांचं आयोजन करण्यात आलं होतं. चर्चेसवर रोषणाई करण्यात आली आहे. नाताळनिमित्त भेटवस्तू घेऊन येणाऱ्या सांताक्लॉजच्या प्रतिकृती लक्ष वेधून घेत आहेत. दुकानं, मॉल्स, उपाहारगृहं आणि पर्यटनस्थळांवर गर्दी झाली आहे. नाताळ निमित्त आज मुंबईतले शेअर, वस्तू, आणि वायदे बाजार बंद आहेत. नाताळनिमित्त राज्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून चर्चमध्ये येशू जन्माचे देखावे साकारण्यात आले तसंच कॅरोल गायनासह विविध कार्यक्रम झाले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी देशवासियांना नाताळनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या सणातून शांती, सलोखा, समता आणि सेवेचा संदेश समाजाला मिळतो असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. येशू ख्रिस्तांची शिकवण सामाजिक नात्यांचे बंध दृढ करते आणि शांततेचा पुरस्कार करते अशा शब्दात उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिल्लीतल्या कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशनमधे जाऊन सामूहिक प्रार्थनेत भाग घेतला. नाताळचा सण समाजात सद्भावना आणि सलोखा निर्माण करतो असं त्यांनी शुभसंदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतल्या सदैव अटल या समाधीस्थळी जाऊन वाजपेयी यांना आदरांजली वाहिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त ‘राष्ट्रनायक यांचा जीवन प्रवास’ या चित्रप्रदर्शनाचं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

काँग्रेसचे जेष्ठ नेते माजी मंत्री सुरुपसिंग नाईक यांच्या पार्थिवावर आज, नंदूरबारमधल्या नवापुर तालुक्यातल्या नवागाव या त्यांच्या मुळ गावी शासकीय

इतमामात अंत्यसंस्कार झाले. यावेळी सुरुपसिंग नाईक यांना हवेत बंदुकीच्या तीन फैरीझाडून मानवंदना देण्यात आली. सरकारचे प्रतिनिधी म्हणून राज्याचे राज शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल अंत्यसंस्काराला उपस्थित होते. यावेळी काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातले मान्यवर आणि मोठ्या संख्येनं लोक उपस्थित होते.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात जलज्योती एन्टरप्रायझेस कंपनीने पॅन कार्ड, आधारकार्ड तसंच अन्य ओळखपत्रांचा गैरवापर करून केलेल्या ३५ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी सुरू केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणातली मुख्य आरोपी सलमा सय्यद आणि अन्य काही जणांनी नोकरीसाठी इच्छुक असलेल्यांची ओळखपत्र चांगल्या पगाराच्या नोकरीचं आश्वासन देऊन गोळा केली होती. या ओळखपत्रांचा वापर करून आणि बनावट स्वाक्षऱ्या करून खोट्या कंपन्या आणि बँक खाती उघडण्यात आली. त्याद्वारे सुमारे ३५ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

नांदेडमध्ये मुदखेड तालुक्यात एका कुटुंबातल्या चौघांनी आत्महत्या केली आहे. या कुटुंबात आई, वडील आणि दोन तरुण मुलगे यांचा समावेश आहे. आत्महत्या करण्यामागचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नसून पोलीस तपास करत आहेत.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यामध्ये शिंदखेडा तालुक्यात बाभळे फाट्याजवळ भरधाव कंटेनरनं दुचाकीला धडक दिल्याने दोन जण जागीच ठार झाले आहेत. या प्रकरणी कंटेनर चालकाने शिंदखेडा पोलीस ठाण्यात आत्मसमर्पण केलं असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

देशभरात आयोजित केलेल्या संसद क्रीडा महोत्सव २०२५ चा समारोप आज झाला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उपस्थितांना दूरस्थ पद्धतीने संबोधित केलं. उत्तर मुंबईत कांदिवली इथल्या मैदानावरही क्रीडा महोत्सवाच्या समारोपाचा कार्यक्रम झाला. यावेळी वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यात पुढचे तीन दिवस कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. राज्यात काही भागात सकाळच्या वेळी विरळ धुकं पडण्याचीही शक्यता असल्याचं हवामान विभागाने म्हटलं आहे.

***//<><><><><>//***